This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No.
अनुक्रमांक

Code No. 62/S/N/M
कोड नं.

Set - A

# MARATHI

# मराठी

# (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators
(निरीक्षकाची सही)
1. ____________________
2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपा करून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यात येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **62/S/N/M-A** लिहावेत.


UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

# MARATHI

## मराठी

## (204)

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 100

---

निर्देश :

1 सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

2 सर्व प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच प्रश्नांचे उत्तरे लिहा.

3 प्रश्न 1 ते 11 पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहा.

---

1 झेल्या हा पाठ व्यंकटेश माडगूळकर यांच्या कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ? 1

(अ) बनगरवाडी (ब) वावटळ

(क) माणदेशी माणसे (ड) उंबरठा

2 निबंधमालेतील पहिल्या निबंधाचे नाव सांगा. 1

(अ) मराठी भाषेचे स्वरूप

(ब) मराठी भाषेची स्थिती

(क) इंग्रजी भाषा आणि आपण

(ड) अँग्लो – मराठी

3 खालील काव्यपंक्तीतील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून लिहा. 1

स्वातंत्र्य त्यासि.......

(अ) संहारीन (ब) चढवीन

(क) दिधले (ड) अर्पीन



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

4 पुढील दिलेल्या पर्यायातून शुद्ध शब्द ओळखा. 1

(अ) मातृशक्ती (ब) मातुशक्ती

(क) मातृशक्ति (ड) मातृशत्की

5 बलाकमाल उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते, 1

उतरूनि येती अवनीवरतीं ग्रहगोलचि एकमतें ।

वरील ओळीत ......... अलंकार आहे.

(अ) रूपक (ब) उत्प्रेक्षा

(क) अनन्वय (ड) अनुप्रास

6 सायलीने मला भेटवस्तू दिली. या वाक्यातील सायली हे ––––– आहे. 1

(अ) विशेषण (ब) क्रियापद

(क) सर्वनाम (ड) नाम

7 नागू गवळ्याचा हातखंडा विषय कोणता होता? 1

(अ) काम

(ब) भांडण

(क) झोप

(ड) हास्य

8 तळ्यातील इतर बदके 'त्या' बदकाला काय म्हणत ? 1

(अ) सुंदर (ब) रूपवान

(क) वेडे (ड) रडे


UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

9 विवासना या शब्दाचा अर्थ काय आहे ? 1

(अ) निर्वासित

(ब) दुर्बळ

(क) जाळे

(ड) परप्रांते

10 महर्षी अण्णासाहेब कर्वे यांना मिळालेला सर्वोच्च पुरस्कार कोणता ? 1

(अ) पद्मभूषण

(ब) भारतरत्न

(क) पद्मश्री

(ड) साहित्यभूषण

11 राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक ----- होत. 1

(अ) लालकृष्ण अडवाणी

(ब) रामभाऊ म्हाळगी

(क) डॉ. केशव बळीराम हेडगेवार

(ड) बाबासाहेब पुरंदरे

12 आर्यभट्ट कोणत्या दोन विषयांचे तज्ज्ञ होते ? 1

13 ज्ञानेश्वरांनी दुष्ट लोकांसाठी कोणती इच्छा प्रकट केली आहे ? 1

14 आकाशात शुभ्र बगळ्यांची माळ दिसली. या वाक्यातील विशेषण ओळखा. 1

15 कन्याकुमारीच्या सूर्योदय आणि सूर्यास्ताचे 'विशेष' काय आहे, असे मानतात ? 1



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

16 महात्मा जोतीबा फुले यांचे पूर्ण नाव लिहा. 1

17 (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन समानार्थी शब्द लिहा. 2

(1) समुद्र

(2) पराक्रम

(ब) खालील म्हणींचा अर्थ लिहा. 2

(1) इकडे आड तिकडे विहीर

(2) कामापुरता मामा

18 कवी मंगेश पाडगावकर यांच्या कवितेतील ध्रुवपदाची ओळ कोणती ? 1

19 वीरपत्नी पतीच्या भाळी कोणता तिलक लावणार आहे ? 1

(अ) विजयतिलक (ब) कुंकमतिलक

(क) शुभतिलक (ड) शुभ्रतिलक

20 मास्तरांनी काढून दिलेल्या 'श्री' कडे पाहून लेखकाला काय वाटले ? 1

21 "कसे वाटते तुम्हाला ?" या वाक्यात वापरलेल्या विरामचिन्हांची नावे लिहा. 1

22 खाली दिलेल्या शब्दसमूहाबद्‌दल एक शब्द सूचवा. 1

(1) अजिबात शत्रू नसलेला

(2) सतत काम करीत राहणारा

23 कवी कुसुमाग्रज नक्षत्रांना कोणता प्रश्न विचारतात ? 1


UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

**24** खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

महात्मा जोतीबा फुले म्हणतात, ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे, तो जगातील सर्वांत पवित्र माणूस. ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्त्व कळत नाही, तो मनुष्य धरणीस भार ठरतो. निर्दोष आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य नि संपत्ती देते. आळशी मनुष्य हा दुष्ट असतो. तो समाजाचा शत्रू बनतो. तो कधीही सुखी होत नाही. उद्योगी आणि शुद्ध चारित्र्याचा मनुष्य हा गरिबांचा वाली असतो. तो अनेकांना सुखी करतो. सत्यप्रेमी, निर्मळ मन आणि शांत हृदय यांतून धैर्य निर्माण होते. धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो.

(1) जगातील सर्वांत पवित्र माणूस कोणास म्हटले आहे ? **1**

(2) मनुष्यास आरोग्य व संपत्ती कशामुळे लाभते ? **1**

(1) धैर्यशील मनुष्याची वैशिष्ट्ये कोणती ? **2**

**25** खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

संतकृपा झाली। इमारत फळा आली॥1॥

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया॥2॥

नामा तयाचा किंकर। तेणे रचिलें ते आवार॥3॥

जनार्द एकनाथ। खांब दिधला भागवत॥4॥

तुका झालासे कळस। भजन करा सावकाश॥5॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केले वोजा॥6॥

(1) भागवत धर्माच्या मंदिराचा पाया कोणी घातला ? **1**

(2) संत एकनाथांनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव लिहा. **1**

(1) 'संतकृपा झाली। इमारत फळा आली।' असे का म्हटले आहे ? **2**

**26** पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) केशवने कोणत्या गोष्टीस नकार दिला ? का ? **2**

(ब) डोंबाऱ्यांनी कसरतीचे कोणकोणते खेळ करून दाखविले ? **2**



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

27 (अ) राज्यस्थापनेच्या कार्यास राजाने कसे वाहून घ्यावे, असे रामदास स्वामींना वाटते? 2

(ब) आई–वडिलांना दररोज नमस्कार करावा. 2

या वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय शोधून त्याची माहिती लिहा.

28 (अ) आचार्य विनोबा भावे यांच्या मते गावाचे गोकुळ केव्हा होईल? 3

(ब) कवी वि. दा. सावरकर सागराला नदीची शपथ का घालतात? 3

29 (अ) खालील पद्यांशाचा संदर्भ अर्थ स्पष्ट करा. 3

उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा।

सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचे रूप महा।

(ब) सकाळी उठल्यावर चोराबद्दल नागू बायकोला काय म्हणाला? 3

30 (अ) 'त्यांच्या नियमितपणामुळे घड्याळे झिजली अन् वेळापत्रके फाटली', हे वाक्य ससंदर्भ स्पष्ट करा. 3

(ब) 'आता' या कवितेत सूर्याकडे पाठ फिरवून शतकांचा प्रवास कुणी व कसा केला असे कवीस वाटते? 3

31 (अ) झेल्याला आपला हिशेब चुकला असे का वाटले? 3

(ब) भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत, असे टिळकांना वाटते? 3

32 परीक्षा जवळ आल्याने अभ्यासाचे नियोजन करण्यासंदर्भात दोन विद्यार्थ्यांमधील संभाषण ८ ते १० वाक्यात लिहा. 4



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279

33 खालीलपैकी एका विषयावर सुमारे 200 शब्दांत निबंध लिहा. **10**

(1) वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे

(2) वृत्तपत्रे बंद पडली तर

(3) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

(4) सर्कशीतील विदूषकाचे मनोगत

34 या पाठ्यपुस्तकातील तुम्हाला सर्वाधिक आवडलेला पाठ कोणता? का? लेखक कोण? **4**

35 तुमच्या मित्राची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. **8**

किंवा

पावसामुळे डासांचा फैलाव झाला आहे. त्याच्या प्रतिबंधात्मक उपायासाठी महानगरपालिका अधिकाऱ्यांना पत्र लिहा.

36 पुढील उताऱ्याचा एक तृतियांश सारांश तुमच्या शब्दात लिहा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. **4**

हास्यवदनाची थोरवी फारच थोड्या लोकांना कळते. सदा हसतमुख असणारा मनुष्य केवळ आपल्या सान्निध्याने, लोकांच्या दुःखाने गारठलेल्या अंतःकरणात आशेची उब निर्माण करील. आधीच जग हे कडू गोष्टींनी, अनुभवांनी भरलेले आहे. अनंत संकटांनी, व्याधींनी व यातनांनी गांजलेल्या या जगात दुःखी कष्टी चेहऱ्यांचा अंधार सर्वत्र भरलेला आहे. हास्याचे सूर्यकिरण या जगात दुर्मिळ आहेत. ते किरण जेथून प्रसृत होतील, त्या चेहऱ्याचे पावित्र्य, शेकडो धर्मक्षेत्रांहून अधिक समजले पाहिजे. नीतीने वागावे असे बोलतांना हसतमुख असावे असेही सांगितले पाहिजे.

37 खालील माहितीच्या आधारे प्रवाह–चार्ट तयार करा. **4**

विद्याप्रसारिणी कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी आणि बारावी अशा दोन इयत्ता आहेत. या दोन्ही वर्गांना इंग्रजी, मराठी आणि गणित हे तीन विषय आहेत. त्यावरून वृक्ष आलेख तयार करा.



UNNATI EDUCATIONS
9899436384, 9654279279